
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# कादंबरी एक वाङ्मय प्रकार

**डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.



संस्कृतमध्ये वाङ्मयाला ‘काव्य’ या व्यापक अर्थाच्या संज्ञेने संबोधले जात होते. मराठीमध्ये देखील काही काळापर्यंत हीच संज्ञा रूढ होती. गद्य, पद्य व नाट्य यांचा विशेष करून या संज्ञेमध्ये समावेश होता. त्याकाळी याच वाङ्मय प्रकारात अधिक लेखन झालेले दिसून येते. म्हणून पद्य व नाटक हे दोन वाङ्मय प्रकार फार प्राचीन आहेत. आधुनिक काळात वाङ्मयाला काव्य असे न म्हणता साहित्य ही संज्ञा रूढ झाली. काव्य ही संज्ञा कवितेपुरतीच मर्यादित होऊन साहित्य या संज्ञेला व्यापकत्व प्राप्त झाले. साहित्यात कविता, नाटक, कथा, कादंबरी या प्रमुख प्रकाराबरोबरच चरित्र, प्रवासवर्णन, लघुनिबंध असे अनेक प्रकार उदयास आले. कादंबरी, लघुनिबंध हे प्रकार पाश्चात्य साहित्यातून आपल्याकडे आले आहेत. लघुनिबंध ना.सी.फडके यांनी मराठीत आणला. तर कादंबरी स्वपावलांनी आलेली दिसून येते. इंग्रजांच्या आगमनानंतर भारतीयांना पाश्चात्य साहित्याची ओळख झाली.

**मुख्य शब्द:** कादंबरी प्रकार, कथा, कादंबरी, नाटक, काव्य

## प्रस्तावना

### १) ऐतिहासिक कादंबरी :

ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास हा घटक महत्वाचा असतो. इतिहासाबरोबर कल्पक जोड दिलेली असते. ऐतिहासिक घटना प्रसंग व सत्याला बाधा न करता लालित्यपूर्ण भाषेत लेखक आपल्या कादंबरीतून इतिहास सांगत असतो. मात्र त्यासाठी त्याला इतिहासाची चांगली जाण असली पाहिजे. ऐतिहासिक कादंबरी इतिहासाच्या अभ्यासास प्रमाण मानली जात नाही. कारण इतिहास व ऐतिहासिक कादंबरी या दोन्ही संकल्पना वेगळ्या आहेत. कादंबरीत काही प्रमाणात काल्पनिक चित्रण आलेले असते. इतिहासाचा अभ्यास करायचा झाल्यास त्याला पुराव्यादाखल साधने दाखवावी लागतात.

इतिहास लेखन व वाचन समाजाला रूक्ष कंटाळवाणे वाटते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर इतिहास वाचला जात नाही. म्हणून ऐतिहासिक कादंबरी द्वारा समाजाला इतिहास सांगणे हा हेतू असतो. इतिहासाबद्दल कुतूहल निर्माण करणे हे ऐतिहासिक कादंबरीचे मुख्य कर्तव्य आहे. कादंबरीमध्ये सहेतूक नाट्यमय प्रसंगांची गुंफण लेखक करीत असतो. मराठी कादंबरीच्या सुरूवातीच्या काळात हा प्रकार फार लोकप्रिय होता. या प्रकारास हरिभाऊंनी प्रसिद्धी मिळवून दिली. (वज्राघात, गड आला पण सिंह गेला) आजच्या काळात पण हा प्रकार लोकप्रिय आहे. म्हणूनच ‘स्वामी’सारखी कादंबरी प्रसिद्धी पावली.

### २) सामाजिक कादंबरी :

सामाजिक ही संकल्पना फार व्यापक आहे. ‘‘समकालीन सामाजिक जीवनाचे चित्रण ज्या कादंबरीत येते तिला सामाजिक कादंबरी असे म्हणतात.’’ समाज जीवन हा घटक येथे महत्वाचा मानला जातो. लेखक हा समाजाचाच एक घटक असतो. समकालीन समाज जीवनाचा एक प्रभाव त्याच्यावर असतो. त्या प्रभावाने प्रेरित होऊनच ती कादंबरीची रचना करत

असतो. समाज जीवनाचे चित्रण कादंबरीत आल्यास वाचक कादंबरीशी एकरूप होतो. आपण जे जीवन जगतो ते अशा प्रकारचे आहे. हे पाहून त्याच्या मनात कुतूहल निर्माण होते. कादंबरीतील घटना प्रसंगांची आपल्या वास्तविक जीवनाशी तुलना करू लागतो. सामाजिक कादंबरी मात्र कितीही जुनी असली तरी ती ऐतिहासिक होऊ शकत नाही.

सामाजिक कादंबरीचे  कल्पनारम्य कादंबरी व वास्तववादी कादंबरी असे दोन प्रकार आहेत. अद्भूतता व कल्पनारम्यता यावर आधारित हा पहिला प्रकार तर वास्तवतेला प्राधान्य देऊन कल्पिलेला दुसरा प्रकार मात्र दोन्ही प्रकारांमध्ये समाजचित्रण हा महत्त्वाचा घटक आहे. मराठी कादंबरीची सुरूवात सामाजिक कादंबरीनेच (यमुनापर्यटन) झाली. पण लक्षात कोण घेतो? ब्राह्मणकन्या, चक्र, वासूनाका या अशा अनेक कादंबऱ्यांची यादी उदाहरणादाखल देता येईल.

### ३) राजकीय कादंबरी :

प्रस्तुत कादंबरी प्रकारामध्ये राजकीय पार्श्वभूमीला महत्वाचे स्थान आहे. ''ज्या कादंबऱ्यांच्याद्वारे देशाच्या विशिष्ट काळच्या राजकीय जीवनावर अथवा राजकारणावर प्रकाश टाकला जातो किंवा कल्पित कथानक आणि राजकीय घटना असे दोन धागे घेऊन  कथानकाची गुंफण केली जाते. त्या कादंबरीला राजकीय कादंबरी म्हटले जाते.''[४०] राजकीय घटनामुळे पात्रांच्या जीवनात ज्या क्रिया-प्रतिक्रिया झाल्या असतील त्यांचे यथार्थ चित्रण करून लेखकाने तत्कालीन जीवनावर प्रकाश टाकला तर अशा कादंबऱ्या राजकीय सदरात मोडतील. विशिष्ट काळची राजकीय पार्श्वभूमी कादंबरीत किती उठावदार झाली आहे. या निकषावरच राजकीय कादंबरीचे खरे मूल्यमापन अवलंबून आहे. मराठीमध्ये माडखोलकरांच्या 'मुक्तात्मा' या कादंबरीला पहिली राजकीय कादंबरी म्हणून ओळखले जाते. पूर्वीच्या कादंबरीपेक्षा आजच्या राजकीय कादंबरीचे स्वरूप वेगळे आहे. जुन्या काळात काही विशिष्ट घटनांनी अथवा स्वातंत्र्यप्राप्तीच्या तळमळीने राजकीय कादंबरीला प्रेरणा मिळाली. आता राजकारणातील दलदल सत्तेसाठी स्पर्धा निवणूकीच्या वेळचे निरनिराळ्या पक्षांचे जाहीरनामे व घोषणा व प्रत्यक्षात सत्ता हाती आल्यानंतर योजना कार्यान्वित करताना त्यानां आलेले विकृत अथवा दांभिक स्वरूप भ्रष्टाचार संधिसाधू राजकीय नेत्यांच्या हालचाली यांचे चित्रण राजकीय कादंबरीत होऊ शकेल. अलिकडील राजकारणावर प्रकाश टाकणाऱ्या 'सिंहासन', 'मुंबई दिनांक','तडजोड' या कादंबऱ्या अरूण साधूंनी लिहिल्या आहेत.

### ४) पौराणिक कादंबरी :

पौराणिक कादंबरी हा ऐतिहासिक कादंबरीचाच एक उपप्रकार म्हणून अभ्यासकांनी मानलेला आहे. इतिहासाच्याही अगोदर जे पौराणिक संदर्भ समाज जीवनामध्ये असतात. त्यांचे वर्णन पौराणिक कादंबरीत असते. पुराणातील एखादी कथा घेऊन वर्तमानाशी तिचा संदर्भ जोडून आपल्या कल्पकतने लेखक पौराणिक कादंबरीची योजना करीत असतो. केवळ पुराण सांगणे हा एकच हेतू त्या पाठीमागे नसतो. पुराणकथा ह्या अशा कादंबरीत रूजलेल्या असतात. पौराणिक कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीसारख्या मर्यादा पडत नाहीत. ऐतिहासिक कादंबरीत घटना, प्रसंग, सत्य हे क्रमाने आलेले असतात. कारण इतिहास पुराणाच्या आधाराने तपासला जातो. पौराणिक कादंबरीतील संदर्भ हे अत्यंत लवचिक असतात असे असले तरी, ह्या कादंबऱ्यात मतभेदाला वाव नसतो. लेखक आपल्या प्रतिभेच्या बळावर लेखनात रोजकता निर्माण करीत असतो.

मराठीमध्ये याप्रकारचे उत्तम उदाहरण म्हणजे वि.स.खांडेकरांची 'ययाति' होय. आजच्या भौतिकवादी जगातील वाचकांनी ययातिची भोगविलासाची कथा फारच डोक्यावर घेतली.

### ५) प्रचारकी कादंबरी :

प्राचीन काळापासून साहित्य हे एक प्रसार माध्यमाचे कार्य करीत आले आहे. आपल्या मताचा विचारांचा प्रचार करण्यासाठी केले जाणारे लेखन म्हणजे प्रचारकी साहित्य होय. हे साहित्य लिहिण्यामागे लेखकाचा काहीतरी हेतू असतो. समस्याप्रधान कादंबऱ्या लिहिताना त्यांचे स्वरूप प्रचारकी होते. विधवांची दुर्दशा चित्रित करणारी 'यमुनापर्यटन' ही कादंबरी ख्रिश्चन धर्माचा प्रचार करणारीही ठरते. प्रचारकी कादंबऱ्या वस्तुस्थिति निदर्शनात्मकच असतात असे मात्र नाही. पुष्कळदा सत्यसृष्टीत न आढळणारे पण लेखकास योग्य वाटत असलेले ध्येय त्यास कादंबरी माध्यमाद्वारा मांडावयाचे असल्याने त्याने निर्माण केलेली पार्श्वभूमी सत्यसृष्टीचे प्रतिबिंब न राहता कल्पनारम्य अशीच असते. प्रचारकी कादंबरीला मराठीत खरी सुरूवात हरिभाऊंनी केली. विशिष्ट हेतू मनात ठेवून किंवा तरूण पिढीस उपदेशाचे चार धडे द्यावेत यासाठीच त्यांनी आपल्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अशा कादंबऱ्यात काही तत्त्वे मांडण्यासाठी विशेष स्वरूपाच्या घटना किंवा प्रसंगही कथानकात आणणे भाग पडून त्याची प्रगतीही स्वाभाविक न होता विशिष्ट उद्देश साधण्याकरिता करणे भाग पडते. याचा परिणाम इतर पूरक घटकावरही

होण्याचा संभव असतो. त्यामुळे कलेची पातळी खालावते व जीवनाचे चित्रण पुष्कळदा एकांगी होते. खांडेकरांच्या कादंबऱ्यातून देशप्रेम समाजसेवा, सत्य, अहिंसा या जीवनमूल्यांचे चित्रण झालेले दिसून येते. मराठी वाङ्मयात प्रचारकी कादंबरीचे कट्टे पुरस्कर्ते म्हणून मामा वरेरकरांना ओळखले जाते.

### ६) चरित्रपर कादंबरी :

समाजामध्ये काही लोकांचे स्थान फार मोलाचे असते. या थोर व्यक्तींच्या विचारांचा पगडा समाजावर पडलेला असतो. मग त्या व्यक्ती कोणत्याही क्षेत्रातील असोत यांच्या जीवनाविषयीचे कुतूहल लेखकांच्या मनामध्ये असते. म्हणून लेखक त्यांच्या जीवनातील घटना व प्रसंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. हा शोध म्हणजेच चरित्रात्मक कादंबरी होय. या मोठ्या व्यक्तींचे अनुभवक्षेत्रही समृद्ध असते. सर्वसामान्य वाचकांना ते नवखे असते.ऐतिहासिक व्यक्तींचे पराक्रम राजकीय क्षेत्रातील विचारवंत यांची चरित्रे हे चरित्रपर कादंबरीचे मुख्य आकर्षण होत.

चरित्रात्मक कादंबरीत चरित्रनायकाच्या जीवनातील कोणत्या घटनांना कथानकाच्या दृष्टीने महत्व आहे, याची स्पष्ट कल्पना लेखकाला असणे जरूर आहे. आपण चरित्रही लिहीत आहोत अशी कल्पना अजाणता का होईना लेखकाच्या मनात वरून असली तर कथानकाच्या गतीला बाधक ठरणारी बरीचशी माहिती नकळत त्या कृतीत डोकावते व अशी कादंबरी कंटाळवाणी होण्याची शक्यता असते. कल्पित कथानकाच्या चौकटीत नीट बसतील असे प्रसंग निवडून त्यांची संगती लावणे व कथानकाची जुळवणी करणे यातच चरित्रपर कादंबरीच्या यशाचे रहस्य आहे.

‘हरि नारायण’ या भीमराव कुलकर्णी यांच्या कादंबरीने चरित्रपर कादंबरीची सुरूवात झाली. नंतरच्या काळात ‘यज्ञ’ (ना.स.इनामदार) ‘स्वामी’,‘श्रीमानयोगी’(रणजित देसाई) मोगरा फुलला (गो.नी.दांडेकर),‘दुर्दम्य’ (गंगाधर गाडगीळ) या सदरात लिहिल्या गेल्या.

वरील प्रकार कादंबरीचे सांगता येतील. अलिकडच्या काळात काळाच्या ओघात अनेक नवीन प्रकारही उदयास आलेले दिसतात. जसे की संज्ञाप्रवाही कादंबरी (रात्रीचा दिवस, तांबडी माती, पाणी–बा.सी मर्ढेकर), अस्तित्ववादी कादंबरी (कोसला–भालचंद्र नेमाडे, चक्र–जयवंत दळवी), आत्मचरित्रात्मक (झोंबी–आनंद यादव), कादंबरी सांगता येतील. कादंबरीच्या आकारावरून कादंबरी व लघुकादंबरी असेही प्रकार सांगता येतील.

### कादंबरी वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये :

वाङ्मयामध्ये प्रत्येक वाङ्मय प्रकाराला एक महत्वाचे स्थान आहे आविष्काराच्या स्वरूपानुसार लेखक प्रकाराची निवड करीत असतो. जो वाङ्मय प्रकार योग्य व जवळचा वाटतो. त्याद्वारे तो अभिव्यक्ती सादर करतो. खरे तर तो आशयच मला या प्रकारातून व्यक्त करा अशी मागणी करत असतो.

हे सर्व वाङ्मय प्रकार एकमेकांपासून वेगळे असल्याचे दिसून येतात. कारण प्रत्येकाची अभिव्यक्ती व रचना वेगळी आहे. इतकेच नाही तर त्यांचे स्वरूपही वेगळे आहे. मनातील भाव कविताच अधिक समर्थपणे व्यक्त करू शकते. तर दिर्घ अशा कथानकास कादंबरीचीच निवड करावी लागते.

प्रत्येक वाङ्मय प्रकाराची खास अशी वैशिष्ट्ये सांगता येतील. लयबद्ध शब्द रचना कवितेत दिसून येते. संवादाशिवाय नाटक उभे राहू शकत नाही. याप्रमाणे कादंबरीचीही काही अभिव्यक्तीवरून व रचनेवरून वैशिष्ट्ये सांगता येतील.

### १) कथानक :

संवादाला नाटकाचा आत्मा मानले जाते. त्याप्रमाणे कथानकाला कादंबरीचा आत्मा मानले जाते. घटना व प्रसंगाची गुंफन करून सांगितलेली हकिकत म्हणजे कादंबरी होय. कविता वगळता सर्वच वाङ्मय प्रकार कथानकप्रधान असले तरी कादंबरीच्या बाबतीत कथानकाला अधिक महत्व आहे. मुख्य कथानकाला प्रभावी करण्यासाठी त्यास पूरक किंवा विरोधी कथानकसुद्धा कादंबरीत येऊ शकते. त्याचे स्वातंत्र्य कादंबरीकाराला असते. कादंबरीतील कथानक म्हणजे एका किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील विवक्षित प्रसंगांची चतुराईची गुंफन होय. कथानकाच्या तीन अवस्था असून या अवस्थांवरच कादंबरीचे यश अवलंबून आहे. त्या अवस्था म्हणजे प्रारंभ, मध्य व शेवट. प्रारंभ म्हणजेच पुढील घडामोडींची भूमिका तयार करणे. मध्य म्हणजे कादंबरीचा उत्कर्षबिंदू होय. कथानकाच्या दृष्टीने शेवट हा देखील महत्वाचा असतो. कादंबरीच्या मागील कथानकास अनुसरूनच शेवट करायला हवा अन्यथा वाचकांचा विरस होण्याची शक्यता असते.

वरील सर्व गोष्टी बरोबरच स्वभावरेखन, वातावरणनिर्मिती, कलाटणी, उत्कंठा या घटकांनाही कथानकामध्ये महत्वाचे स्थान आहे. या सर्व गोष्टी ज्या कादंबरीकारास जमलेल्या आहेत आणि त्यांच्या कादंबरीचा कथाविषय उत्कृष्ट आहे. त्या कादंबऱ्या अधिक प्रसिद्धी पावल्या आहेत.

### २) विस्तार :

हा वाङ्मयप्रकार इतर प्रकारांपेक्षा विस्ताराने मोठा आहे. कथा वाङ्मयातून जन्माला आलेला हा प्रकार कथेच्या मर्यादेमुळेच जन्माला आला. काही कथानके अशी असतात की, कथा, नाटक या प्रकारामध्ये बसू शकत नाहीत. कारण यामध्ये कालखंडाचा एक व्यापक पट असतो. अनेक घटना –घडामोडी असतात. अनेक व्यक्तिरेखा असतात अशी कथावस्तू केवळ कादंबरीमध्ये सामावू शकते. या गरजेतूनच कादंबरी उदयास आली.

लेखकाच्या कल्पनाविस्तारास कादंबरीमध्ये अधिक वाव असतो. इतर प्रकारामध्ये यावर मर्यादा पडते. इतकेच नाही तर प्रसंग वर्णनावरही लेखकास अनेक पाने खर्ची घालता येऊ शकते. घटनाही अधिक समाविष्ट करता येऊ शकतात. म्हणून लेखकाच्या दृष्टीने कादंबरी हा वाङ्मय प्रकार अधिक उपयुक्त आहे. या गुणामुळेच श्रीकृष्ण, कर्ण या महापुरुषांची व्यक्तिमत्वे कादंबरी साकारू शकली. अभिव्यक्तीसाठी आधुनिक काळात एक विस्तीर्ण पट असलेल्या गद्य वाङ्मय प्रकाराची गरज होती. ती कादंबरीने पूर्ण केली.

### ३) व्यापकत्व :

साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा आहे, असे म्हटले जाते. त्याप्रमाणे साहित्यात मानवी जीवन चित्रण येणं अपरिहार्य आहे. परंतु कवितादि प्रकारातून माणसांच्या सर्वांगाचे चित्रण होईलच असे निश्चित सांगता येणार नाही. परंतु कादंबरीच्या बाबतीत मात्र आपण असे ठाम विधान करू शकतो. व्यक्ती हा कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्याचा वावर असलेली सर्व क्षेत्रे कादंबरीने व्यापली आहेत. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. सर्व क्षेत्राचं चित्रण कादंबरीमध्ये येऊ शकते. स्थल आणि काळाची मर्यादा कादंबरीला नाही. कादंबरीच्या अनुभव क्षेत्राविषयी योझ ओर्त्तेगा गसेट आपल्या 'नोट्स ऑन द नॉव्हेल' या निबंधात लिहितात,

''Within the novel almost anything fits Science religion sociology aesthetic criticism if only it is ultimately derealised and confind within the inner world of the novel.'' मानवी जीवन व्यवहारांचे कोणतेही रूप आविष्कृत करण्याची क्षमता कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये आहे. जसे कादंबरीचे क्षेत्र सिमीत नाही. तशीच तिची रचनादेखील कोणत्याही ठराविक स्वरूपाच्या तांत्रिक बंधनापासून मुक्त आहे.

### ४) वास्तवता :

कादंबरीचा संबंध वास्तव जीवनाशी आहे. अवास्तविक गोष्टींना कादंबरीमध्ये स्थान नाही. काही प्रमाणात जे काल्पनिक चित्रण येते. तेही वास्तविक पातळीवरचे असते. ज्या घटना काल्पनिक वाटतात त्या माणसांच्या जीवनात केव्हाही घडू शकतात. म्हणून याचीही गणना वास्तवात केली जाते. कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा वास्तव जगाशी संबंधित आहेत. ज्या जगात आपण राहत आहोत.त्याच 'सत्य' जगाचा आभास निर्माण करणारी शब्दसृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करतो. 'द राईज ऑफ द नॉव्हेल' या ग्रंथात इयान वॅट नमूद करतात,

''With the help of their larger perspective the historians of novel have been able to do much more to determine the idiosyncratic featurers of the news form. Briefly they have seen realisam as the defining characteristic which differentiates the work of early eighteenth century novelists from previous fiction.'' वरील सर्व प्रमुख वैशिष्ट्यांबरोबर अनेक पात्र, कथन व निवेदनाला अधिक महत्व, मनोविश्लेषण हीही कादंबरीचे वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. या सर्व वैशिष्ट्यांमुळे कादंबरीचे वेगळेपण व श्रेष्ठत्व सिद्ध होते.

वरीलप्रमाणे कादंबरीच्या व्याख्या स्वरूप वैशिष्ट्यांविषयी अनेक अभ्यासकांनी विश्लेषण केले असले तरी ते परिपूर्ण आहे, असे म्हणता येणार नाही. कादंबरीची नेमकी व्याख्या करणे तिचे स्वरूप स्पष्ट करणे कठीण आहे. विस्ताराने व्यापक अनुभवाने समृद्ध असा हा प्रकार मोजक्या शब्दात सांगणे शक्य नाही. पुढील भागात कादंबरी व इतर वाङ्मय प्रकारातील संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ❖ कादंबरी व इतर वाङ्मय प्रकार :

साहित्यामध्ये अभिव्यक्तीवरून कथा, कादंबरी, नाटक, काव्य असे अनेक प्रकार निर्माण झालेले दिसून येतात. हे प्रकार मानायचे किंवा नाही याविषयी विचारवंतामध्ये दूमत असलेले दिसून येते. एखादा आशय ठराविक वाङ्मय प्रकारामधूनच अधिक अभिव्यक्त होऊ शकतो. म्हणून साहित्यामध्ये वाङ्मय प्रकाराला अधिक महत्व आहे. हे प्रकार भिन्न वाटत असले तरी ते एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे करता येणार नाहीत. परस्परसंबंधी असे आहेत.

### कादंबरी व नाटक :

नाटक हा दृश्य आणि श्राव्य प्रकार आहे. या वैशिष्ट्यामुळे अनेक मर्यादाही नाटकावर पडलेल्या दिसतात. मनोरंजन करणे हे दोन्ही प्रकाराची वैशिष्ट्य. परंतु कादंबरी एकावेळी एकाच व्यक्तीचे मनोरंजन करू शकते. परंतु नाटक एकाच वेळी हजारो व्यक्तींचे मनोरंजन करू शकते. कादंबरीचे क्षेत्र नाटकापेक्षा अधिक विस्तृत असल्यामुळे सामाजिक जीवनाचा चित्रपट अधिक मोठ्या प्रमाणात चित्रित करायला कादंबरी हे साधन उपयुक्त ठरते. लेखकाला स्वत:चा दृष्टीकोन, मते, विचार जीवनभाष्य व्यक्त करायला कादंबरीत अधिक वाव असतो. ''कादंबरीकाराला आपल्या कलात्मतेचे प्रदर्शन करायला दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचे साहाय्य घेण्याची आवश्यकता नसते. नाटककाराला आपला कलाविष्कार स्वतंत्रपणे करता येत नाही. त्यासाठी त्याला तीन गोष्टींचे सहाय्य घ्यावे लागते. नाट्यगृह, नट आणि प्रेक्षक तरच नाटककर्त्याचे लेखन खऱ्या अर्थाने सार्थकी लागणार आहे.'' म्हणजेच नाटकाचे यश केवळ लेखकावर अवलंबून नसून इतरही काही घटकावर अवलंबून आहे. नाटककला ही कादंबरी लेखनासारखी स्वतंत्र नाही. दोन्ही प्रकारात विस्तार, मांडणी, प्रसंगयोजना, व्यक्तिचित्रण इतकेच नाही तर विषयाची निवड यामध्येही भेद जाणवतो. कादंबरीत अनेक लहानमोठ्या प्रसंगाची मालिका गुंफायला लेखकाला अवसर मिळतो. तर नाटकात चार दोन प्रसंगापलीकडे फारसे घालता येत नाही. नाटकात पात्रांच्या स्वभावाचे पानोनपान चित्रण करता येते. नाटकात मात्र संवादाच्या व पात्रांच्या कृतीतून व्यक्तिदर्शन घडविले जाते. नाटकाला वेळेचे बंधन आहे.

### कादंबरी व कथा :

या दोन प्रकारामध्ये बरेच साम्य दिसून येते. कथानक, व्यक्तिचित्रण, निवेदन या घटकांच्या बाबतीत हे साम्य दिसून येते. कथेमध्ये एकच कथानक असते तर कादंबरीमध्ये एकापेक्षा अधिक कथानक येऊ शकतात. तेच पात्रांच्या बाबतीत कथेमध्ये पात्रांच्या संख्येवर मर्यादा पडते. जितकी परिणामकारकता कादंबरीने साधता येते तितकी कथेतून साधता येत नाही. म्हणूनच कादंबरीची तुलना महाकाव्याशी केली जाते.

### कादंबरी व कविता :

या दोन प्रकारात बरेच वेगळेपण दिसून येते. कादंबरी कथानक प्रधान गद्य वाङ्मय प्रकार आहे तर कविता पद्यमय, काव्यात भावनेला अधिक प्राधान्य असते. विस्ताराच्या दृष्टीने विचार केल्यास कादंबरी सरस ठरेल. जीवनाच्या व्यापक दृष्टीने विचार करण्याची क्षमता काव्यात नाही. लालित्य, गोडवा या गोष्टी पद्यामध्ये जशा आढळतात तशा कादंबरीमध्येही आढळतात. म्हणून कादंबरीला गद्यकाव्य असेही म्हटले जाते. काव्य छंदबद्ध असल्यामुळे काव्यात लय व ताल दिसून येतो. कादंबरीत याचा अभाव आहे.

''काव्यात रचनेला महत्व असते तर कादंबरीत विश्लेषणाला, काव्यात रसात्मक माधुर्य, लय नादबद्धता असते, ते गेय असते. तशी कादंबरी नसते.'' वाचकांच्या दृष्टीने मात्र दोन्ही प्रकार तितकेच लोकप्रिय आहेत.

### निष्कर्ष:

कादंबरी एक प्रमुख वाङ्मय प्रकार विचार केला आहे. अनेक विचारवंतांनी कादंबरीच्या व्यामिश्र रूपाचे विवेचन केले आहे. महाकाव्याशी साधर्म्य साधणारा हा प्रकार मानवी जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारा आहे. कादंबरीचे प्रारंभीचे रूप व

आजचे रूप यामध्ये फार मोठे अंतर आहे. जसा काळ लोटला तसे या प्रकारामध्ये तांत्रिकदृष्ट्या विकास होत गेला. आशयाच्या दृष्टीने विचार केला तर विविधता येत गेलेली दिसते. आपल्या अंगभूत सामर्थ्यामुळेच हा प्रकार लोकप्रिय झाला असे म्हणावे लागेल.

## संदर्भ टीपा

१. तत्रैव : पृ.१९५
२. ल.ना. जोग : 'कादंबरी' चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९६३,पृ.५५
3. Gasset,Jose Ortega Y.: The Dehumanization of Art and other Essays on Art, Culture and Literature, Princetion University Press, Princetion, 1972 P.103
4. Ian Watt: The Rise of the Novel, Studies in Defoe, Richardson and Fielding Chatto and Windus, London, 1960 P.10
५. बालशंकर देशपांडे : 'कादंबरी विवेचन आणि विश्लेषण', पृ.८२
६. जान्हवी संत : 'कादंबरी एक वाङ्मयप्रकार', मोघे प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती पहिली १९७१, पृ.२२